# सोयाबीन लागवडीसाठी वाण निवड

डॉ. आदिनाथ ताकटे,
डॉ. अनिल राजगुरू

सोयाबीन लागवडीसाठी कृषी विद्यापीठांनी विविध गुणवैशिष्ट्ये असलेले वाण विकसित केले आहेत. लागवडीसाठी स्थानिक परिस्थितीनुसार कमी, मध्यम व उशिरा कालावधीत तयार होणारे, अवर्षणास प्रतिकारक्षम, कीड व रोगास प्रतिकारक, चांगले उत्पादन देणाऱ्या वाणाची निवड करावी.

## आघारकर संशोधन संस्था, पुणे विकसित वाण

### एमएसीएस १४६०

**प्रसारण वर्ष :** २०२१

**परिपक्वता कालावधी :** ९५ दिवस

**वैशिष्ट्ये :** चांगले उत्पादन देणारे वाण, कमी कालावधीत पक्व होणारा, दुष्काळसदृश परिस्थितीत चांगले उत्पादन देणारे वाण, कीड व रोगास कमी बळी पडते, यांत्रिक कापणीस योग्य.

हेक्टरी उत्पादन : २२ ते ३८ क्विंटल.

### एमएसीएस ११८८

**प्रसारण वर्ष :** २०१२

**परिपक्वता कालावधी :** ११० दिवस

**वैशिष्ट्ये :** काढणीच्या वेळी शेंगा फुटत नाहीत, यांत्रिक कापणीस योग्य

**हेक्टरी उत्पादन :** २८ ते ३५ क्विंटल

### एमएसीएस १४०७

**प्रसारण वर्ष :** २०२१

**परिपक्वता कालावधी :** १०४ दिवस

**वैशिष्ट्ये :** काढणीच्या वेळेस शेंगा फुटत नाहीत, खोडमाशी प्रतिरोधक

**हेक्टरी उत्पादन :** २० ते ३० क्विंटल.

### एमएसीएस १५२०

**प्रसारण वर्ष :** २०२१

**परिपक्वता कालावधी :** १०० दिवस

**वैशिष्ट्ये :** यांत्रिक कापणीस योग्य, खोडमाशी प्रतिकारक्षम

**हेक्टरी उत्पादन :** २१ ते २९ क्विंटल

## भारतीय सोयाबीन संशोधन संस्था, इंदोर (मध्यप्रदेश) येथून विकसित वाण :

### एनआरसी ३७ (अहिल्या-४)

**प्रसारण वर्ष :** २०१७

मध्य प्रदेश, महाराष्ट्र, राजस्थान या राज्यांत लागवडीसाठी शिफारस

**परिपक्वता कालावधी :** ९६ ते १०२ दिवस

**वैशिष्ट्ये :** चांगला उत्पादन देणारा वाण

**हेक्टरी उत्पादन :** ३५ ते ४० क्विंटल

### एनआरसी १५७

**प्रसारण वर्ष :** २०२१-२२

**परिपक्वता कालावधी :** ९४ दिवस

**वैशिष्ट्ये :** उशिरा लागवडीसाठी (२० जुलैपर्यंत) शिफारशीत वाण

**हेक्टरी उत्पादन :** १६ ते २० क्विंटल

### एनआरसी १३८ (इंदोर सोया १३८)

**प्रसारण वर्ष :** २०२१

**परिपक्वता कालावधी :** ९० ते ९४ दिवस



सोयाबीन : तूर (४:१) आंतरपीक लागवड.

**वैशिष्ट्ये :** तांबेरा आणि पिवळा मोझॅक रोगास प्रतिकारक्षम

**हेक्टरी उत्पादन :** २५ ते ३० क्विंटल

## जवाहरलाल नेहरू कृषी विश्व विद्यापीठ, जबलपूर (मध्य प्रदेश) येथून विकसित वाण

### जेएस ३३५

**प्रसारण वर्ष :** १९९४

**परिपक्वता कालावधी :** ९५ ते १०० दिवस

**वैशिष्ट्ये :** मध्यम ते भारी जमिनीत लागवडीस योग्य, हळवा वाण, दाण्याचा रंग पिवळा, मध्यम आकाराचे दाणे, आंतरपिकास योग्य.

**हेक्टरी उत्पादन :** २५ ते २८ क्विंटल

### जेएस २०९८

**प्रसारण वर्ष :** २०१७ ते १८

**परिपक्वता कालावधी :** ९५ ते ९८ दिवस

**वैशिष्ट्ये :** उंच वाढणारे असल्याने हार्वेस्टरने काढण्यास योग्य वाण.

**हेक्टरी उत्पादन :** २५ ते २८ क्विंटल

### जेएस ९३-०५

**प्रसारण वर्ष :** २००२

**परिपक्वता कालावधी :** ८५ ते ९० दिवस

**वैशिष्ट्ये :** लवकर येणारे वाण, हलक्या व मध्यम जमिनीसाठी योग्य, न पडणारे व शेंगा न फुटणारे वाण.

**हेक्टरी उत्पादन :** २५ ते २८ क्विंटल

### ४) जेएस ९५-६०

**परिपक्वता कालावधी :** ८२ ते ८८ दिवस

**वैशिष्ट्ये :** जाड दाणा, चार दाण्याचा शेंगा असलेले तसेच दुष्काळसदृश परिस्थितीत चांगले उत्पादन देणारे वाण

**हेक्टरी उत्पादन :** २० ते २५ क्विंटल

- डॉ. आदिनाथ ताकटे,
९४०४०३२३८९
(एकात्मिक शेती पद्धती संशोधन प्रकल्प, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)
- डॉ. अनिल राजगुरू,
९४२१९५२३२४
(कृषी वनस्पतिशास्त्र विभाग, कृषी महाविद्यालय, पुणे)

छोट्या जाहिराती
व्यवसायवृद्धीचा मार्ग

क्लासिफाइड
सहा ओळींसाठी फक्त ५०० रुपये, पुढील प्रत्येक जादा ओळीस रु. ८५/-

विशेष योजना:
२ पेड + १ फ्री, ३ पेड + २ फ्री, ५ पेड + ५ फ्री, १०पेड + १२ फ्री

बी - बियाणे

बियाणे / रोपे विक्री

**तुरीचे सर्वोत्कृष्ट वान राहुरीचे संशोधन दुर्मिळ असलेले** फुले तृप्ती, फुले राजेश्वरी व सोयाबीन अमेरिकन सुपर फुले दुर्वा ९९२ बियाणे मिळेल. मो.९५६१६२३४९८.

**विविध जातीचे हळद बियाणे** विक्रीस उपलब्ध फक्त सहा महिन्यात येणारी हळदीची जात 1) ACC 48 प्रगती स्पाइस बोर्डा कडून उत्पादित आणी प्रसारीत जात 2) वायगाव-केवळ सात महिन्यात येणारी हळद 3) चेन्नासेलम -ओल्या हळदीमध्ये उच्चउत्पादन क्षमता असणारी आचारसाठी सर्वोत्कृष्ट व्हरायटी ४) मेघा ल्याची उच्च कर्क्युमिन% साठी जगप्रसिध्द असलेली व्हरायटी. LAKAD

नोकरीविषयक

नोकरी देणे

**स्टार बायोटेक पुणे जी महाराष्ट्रा** मधील कृषी क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी जी विद्राव्य खते, सूक्ष्म अन्नद्रव्य, जैविक खते, पीजीआर इत्यादी विक्रीसाठी पश्चिम महाराष्ट्र विदर्भ व मराठवाडा या विभागा साठी एरिया सेल्स ऑफिसर, रीजनल सेल्स मॅनेजर, सेल्स ऑफिसर फिल्ड असिस्टंट इत्यादी पदे भरावयाची आहेत तरी याच क्षेत्रात कामाचा कमीत कमी 5 ते 7 वर्ष अनुभव असणाऱ्यांनी खालील नंबर वर रिझ्युम पाटवा किंवा मेल करा 9657714628 star biotech10@gmail.com

व्यवसायविषयक

जलसिंचन

बोअरवेल्स

त्वरा करा!! त्वरा करा!! त्वरा करा!! बोअरवेलचे पाणी वाढवणारे पेटंटेड तंत्रज्ञान फक्त ०८ हजार रुपयात. मराठवाड्यातील जिल्ह्यां साठी मर्यादित योजना. प्रथम नोंदणी करणाऱ्या ५०० शेतकऱ्यांना सवलतीच्या दरात सेवा. संपर्क: 8956960567 / 8956960566.

जागाविषयक

जागा मोकळी विकत/ भाड्याने देणे

२५ वर्षापासुन सेंद्रीय शेत